

के. के. वाघ महाविद्यालयातील कॅम्पस इंटरव्ह्यूमध्ये निवड झालेल्या विद्यार्थ्यांसमवेत प्राध्यापक व अधिकारी.

**प्लेसमेंट** | के. के. वाघ कॉलेजात एल अँण्ड टी इन्फोटेकचा पुढाकार

# इंजिनिअरिंग, एमबीए विद्यार्थ्यांना करिअर संधी

प्रतिनिधी | नाशिक

व्यावसायिक शिक्षणाचा टप्पा पूर्ण केल्यानंतर विद्यार्थ्यांना रोजगाराची संधी मिळावी या उद्देशाने के. के. अभियांत्रिकी महाविद्यालयात आयोजित कॅम्पस इंटरव्ह्यूमध्ये आठ विद्यार्थ्यांना एल अँण्ड टी इन्फोटेक कंपनीत संधी मिळाली. याशिवाय डॉ. मुंजे इन्स्टिट्यूटमधील अशाच उपक्रमात एमबीए कॉलेजच्या १६ विद्यार्थ्यांची यात निवड झाली असून, विद्यार्थ्यांना यानिमित्ताने प्लेसमेंटची मोठी ऑफर मिळाली आहे.

के. के. वाघ अभियांत्रिकी महाविद्यालयात शैक्षणिक वर्ष २०१६ व २०१७ मधील अंतिम वर्षात असलेल्या कॉम्प्युटर, आयटी, इलेक्टॉनिक्स, इएनटीसी आणि एमसीए शाखेच्या विद्यार्थ्यांसाठी कॅम्पस इंटरव्ह्यूचे आयोजन करण्यात आले होते. एल अँड टी इन्फो टेकच्या एचआर विभागाचे प्रमुख करण श्रीवास्तव यांनी विद्यार्थ्यांची निवडप्रक्रिया राबवली. त्यात आठ विद्यार्थ्यांची निवड झाली असून, वार्षिक तीन लाख २० हजार रुपयांच्या वार्षिक पॅकेजची ऑफर मिळाली आहे. त्यात कॉम्प्युटर शाखेचे पाच विद्यार्थी, तर इतर शाखांच्या ३ विद्यार्थ्यांची निवड झाली आहे.

## आठ विद्यार्थ्यांची 'एल अँड टी'मध्ये निवड

**के. के. वाघ अभियांत्रिकीसह इतर शाखांच्या आठ विद्यार्थ्यांची निवड झाली आहे. त्यात अपेक्षा ढोका, अपूर्वा टिपरे, इशा अग्रवाल, रेणुका लेले, प्रथमेश पिंपळे, देवांशी दत्तानी, शंतनू राजपूत, आश्विनी भावसार यांची एल अँड टीमध्ये निवड झाली. संस्थेचे अध्यक्ष बाळासाहेब वाघ, के. एस. बंदी, प्राचार्य डॉ. केशव नांदुरकर, डॉ. एस. साने, डॉ. पी. के. शहाबादकर यांचे मार्गदर्शन लाभले.**

## डॉ. मुंजे इन्स्टिट्यूटच्या १६ विद्यार्थ्यांना संधी

डॉ. मुंजे इन्स्टिट्यूटमध्ये नुकतेच नोकरी मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. या मेळाव्यात ९ कंपन्यांनी सहभाग घेतला. यात शहरातील विविध कॉलेजांतील २५० विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला. यात प्रामुख्याने मार्व्हल टेक्नॉलॉजी, बँकएड्ज, क्रेडिट सुधार, डब्ल्यूएनएस, फिनिक्स किचन इ. कंपन्यांनी रोजगार मेळाव्यात सहभाग घेतला. आतापर्यंत वेबविंग टेक्नॉलॉजी, झेड टेक कन्सल्टिंग आणि डब्ल्यूएनएस या ३ कंपन्यांनी मिळून एकूण १६ विद्यार्थ्यांची निवड केली. इन्स्टिट्यूटचे संचालक डॉ. श्रीराम झाडे, आदित्य शिरोडे आणि प्रशांत मोरे यांचे विद्यार्थ्यांना मार्गदर्शन लाभले.

दै. दिव्य मराठी, दि. १९-०१- २०१७

# Eight KK Wagh engineering students placed at L&T InfoTech



L&T team along with students who received placements.

**LOKMAT NEWS NETWORK**
**NASHIK, JAN 18**

The team from L&T Info Tech recently visited KK Wagh Engineering College for conducting the campus interview for Final Year Computer, IT Electronic, E&TC students and MCA students of 2016-17 batches. The team was received by Principal Dr KN Nandurkar. Campus selection started with a pre-placement talk by HR manager, L&T Karan Shrivastav, followed by an online test for 60 minutes, group discussion, technical and HR interview. At the end of the selection process, eight students namely Apeksha Dhoka, Apoorva Tipre, Isha Agrawal, Renuka Lele, Prathamesh Pimpale, Devanshi Dattani, Shantanu Rajput and Ashwini Bhavsar were given offer letters with a package of 3.20 lacks per annum. President Balasaheb Wagh advised the selected students to work hard in the organization while other members and professors congratulated the students on their achievement.

COLLEGE BUZZ

# कॅम्पस इंटरव्ह्यूतून पाच विद्यार्थ्यांना नोकरी

**म. टा. प्रतिनिधी,** नाशिक



डिग्री पूर्ण होण्यापूर्वीच विद्यार्थ्यांना नोकरीची उत्तम संधी मिळावी, या उद्देशाने के. के. वाघ इंजिनीअरिंग कॉलेजमध्ये कॅम्पस इंटरव्ह्यूचे आयोजन करण्यात आले होते. 'एबीबी' आणि 'जनरल मिल्स' या कंपन्यांकडून ही प्रक्रिया राबविण्यात आली. यात पाच विद्यार्थ्यांची निवड करण्यात आली. त्यांना प्रत्येकी साडे चार लाख रुपयांचे पॅकेज देण्यात आले.

या कॉलेजमधील इलेक्ट्रीकल आणि मेकॅनिकल या विभागातील विद्यार्थ्यांसाठी हे इंटरव्ह्यू घेण्यात आले. एचआर हेड जास्मीन यांनी प्री प्लेसमेंट चर्चा केली. प्रथमऑनलाइन टेस्ट, त्यानंतर एबीबी कंपनीमध्ये टेक्निकल इंटरव्ह्यू , ग्रुप डिस्कशन, वैयक्तिक मुलाखत फेरी असे इंटरव्ह्यू घेण्यात आले. यातील तीन विद्यार्थ्यांची 'एबीबी'मध्ये ग्रॅज्युएट इंजिनीअर ट्रेनी म्हणून निवड झाली. निवड झालेल्या विद्यार्थ्यांना कंपनीने ४ लाख ५० हजार रुपयांचे पॅकेज देऊन ऑफर लेटर दिले. यामध्ये इलेक्ट्रीकल विभागाचे विनायक चव्हाण, गौरिष गोखले, समृद्धी कोळी या विद्यार्थ्यांचा समावेश आहे. जनरल मिल्स या कंपनीतर्फे घेण्यात आलेल्या कॅम्पस इंटरव्ह्यू प्रक्रियेत मेकॅनिकल विभागाच्या विद्यार्थ्यांना संधी मिळाली. जनरल मिल्समध्ये आशिष कुमार पटनाईक आणि वेंकी कटारिया यांची निवड झाली. यावेळी कॉलेजचे ट्रेनिंग अँड प्लेसमेंट अधिकारी डॉ. पी. के. शहाबादकर उपस्थित होते. या टीमचे प्राचार्य डॉ. के. एन. नांदूरकर यांनी कंपनीच्या अधिकाऱ्यांचे विद्यार्थ्यांना ही संधी उपलब्ध करुन दिल्याबद्दल आभार मानले.



# के. के. वाघच्या विद्यार्थ्यांची निवड

**म. टा. प्रतिनिधी,** नाशिक

विद्यार्थ्यांना नोकरीच्या संधी शिक्षण घेतानाच मिळाव्यात या उद्देशाने के. के. वाघ इंजिनीअरिंग कॉलेजमध्ये 'फिन आयक्यू' कंपनीमार्फत कॅम्पस इंटरव्ह्यू प्रक्रिया घेण्यात आली. आयटी, इलेक्ट्रीकल, कॉम्प्युटर, इलेक्ट्रॉनिक्स या विभागातील विद्यार्थ्यांसाठी ही प्रक्रिया राबविण्यात आली. ऑनलाईन टेस्ट, टेक्निकल टेस्ट आणि वैयक्तिक मुलाखत फेरी या माध्यमातून ही प्रक्रिया पार पडली. या सर्व पातळ्या यशस्वीरित्या पूर्ण केलेल्या अकरा विद्यार्थ्यांची कंपनीने निवड केली असून त्यांना प्रत्येकी ३ लाख २० हजार रुपयांचे पॅकेज देण्यात आले आहे. पंकज नलावडे, जय कौशिक, सिद्धांत घुगे, प्रिया अग्रवाल, प्रणव तिवारी, मयुरी भामरे, रुचिरा मुळे, निलम वाबळे, गौरी पगारे, पल्लवी रावणकर, प्रणेषा कोल्हे या विद्यार्थ्यांचा यात समावेश असल्याची माहिती कॉलेजचे ट्रेनिंग अँड प्लेसमेंट अधिकारी डॉ. पी. के. शहाबादकर यांनी दिली. तर प्राचार्य के. एन. नांदूरकर यांनी कंपनीच्या अधिकाऱ्यांचे विद्यार्थ्यांना संधी उपलब्ध करुन दिल्याबद्दल आभार मानले.

## क. का. वाघ अभियांत्रिकीच्या 'कॅम्पस'मध्ये पाच जणांची निवड

नाशिक, ता. २४ : एबीबी कंपनी, तसेच जनरल मिल या कंपन्यांनी नुकतीच क. का. वाघ अभियांत्रिकी महाविद्यालयाला भेट दिली. या वेळी झालेल्या कॅम्पस इंटरव्ह्यूमध्ये इलेक्ट्रिकल व मेकॅनिकल विभागातील अंतिम वर्षाच्या विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला. त्यापैकी पाच विद्यार्थ्यांची निवड करण्यात आली असून, त्यांना साडेचार लाख रुपये प्रतिवर्ष असे भरघोस पॅकेज दिले. एबीबी कंपनीतर्फे एचआर प्रमुख जॅसमिन जोसेफ यांनी बेंगळुरू येथून व्हिडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे इच्छुक विद्यार्थ्यांशी संवाद साधला. पहिल्या फेरीत ऑनलाइन चाचणीतून ११६ विद्यार्थी पात्र ठरले. यातून २१ विद्यार्थ्यांची निवड पुढील फेरीसाठी करण्यात आली. २१ पैकी आठ विद्यार्थ्यांना ग्रॅज्युएट असेसमेंट सेंटर, वडोदरा (गुजरात) येथे बोलविण्यात आले. वडोदरा येथे मुलाखत घेतल्यानंतर तीन विद्यार्थ्यांची निवड ग्रॅज्युएट इंजिनिअर ट्रेनी (जीईटी) या पदासाठी करण्यात आली. विनायक चव्हाण, गौरीश गोखले, समृद्धी कोळी यांची निवड करण्यात आली. लेखी परीक्षा घेतल्यानंतर मॅकॅनिकल शाखेतील १५ विद्यार्थ्यांची निवड करण्यात आली. १५ पैकी चार विद्यार्थी अंतिम मुलाखतीसाठी निवडले गेले. मुलाखतीच्या फेरीनंतर दोन विद्यार्थ्यांची अंतिम निवड करण्यात आली. आशिष पटनाईक, वन्की कटारिया अशी निवड झालेल्या विद्यार्थ्यांची नावे आहेत. क. का. वाघ शिक्षण संस्थेचे अध्यक्ष बाळासाहेब वाघ, विश्वस्त चांगदेवराव होळकर, अशोक मर्चंट, समीर वाघ, सचिव प्रा. के. एस. बंदी, प्राचार्य डॉ. नांदूरकर, प्रा. डॉ. पी. के. शहाबादकर यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

दै. सकाळ , दि. २५-०१-२०१७